**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 25.12.2024** **वार – बुधवार**

---

**नाताळ**

ख्रिसमसनिमित्त पुणे शहरातील विविध चर्चमध्ये काल रात्री प्रार्थनेनंतर रात्री 12 वाजल्यापासून प्रभू येशूचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. येणाऱ्या नवीन वर्षाचं स्वागत करण्यासाठी ख्रिश्चन धर्मीय नागरिकांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. आज सकाळीदेखील चर्चमध्ये प्रभुयेशूच्या स्तुतीपर गीतांचं गायन आणि संदेशांचं वाचन करण्यात आलं.

**मेट्रो**

उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुणे मेट्रोच्या कामाची पाहणी करून आढावा घेतला. तसच मंडई मेट्रो स्थानकाच्या कामाची पाहणी केली. महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी पुणे मेट्रोच्या 33 किलोमीटर मार्गाच्या पहिल्या टप्पाच्या उर्वरित कामासंबंधी माहिती दिली तसच सध्याची मेट्रो प्रवासी संख्या आणि ती वाढवण्यासाठी राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यानंतर चंद्रकांत पाटील यांनी मेट्रोतून प्रवास केला. मंडई स्थानकात आमदार हेमंत रासने यांनी त्यांच स्वागत केले. चंद्रकांत पाटील यांनी मेट्रोच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केलं.

**विशेषो पचार**

पुणे महापालिकेच्या रूग्णालयांमधील बाहयरूग्ण विभागांमध्ये रूग्णांना सुपरस्पेशालिटी सुविधा मिळाव्यात यासाठी आरोग्य विभागाकडून पुढाकार घेण्यात आला आहे. जानेवारी महिन्यापासून येरवडा इथलं राजीव गांधी रूग्णालय आणि बोपोडी इथल्या खेडेकर दवाखान्यामध्ये दर सोमवारी विशेषोपचार सुविधा सुरू केल्या जणार आहेत. याबाबत वैद्यकीय अधिक्षक डॉक्टर हनुमंत चव्हाण आणि महापालिका आरोग्य प्रमुख डॉक्टर नीना बोराडे यांच्यामध्ये आज बैठक पार पडली.

**चित्रपट**

सातवा अण्णाभाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 27 ते 29 डिसेंबर दरम्यान पुण्यात होणार असल्याची माहिती आयोजक संदीप ससाणे आणि अबोली सुपेकर यांनी दिली आहे. राष्ट्रीय चित्रपट संग्रहायलामध्ये तीन दिवसांमध्ये 79 चित्रपटांचं प्रदर्शन सकाळी नऊ ते रात्री नऊ या वेळीत होणार आहे. महोत्सवाचं उद्घाटन दिग्दर्शक अभिजित पानसे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी ज्येष्ठ अभिनेते सिध्दार्थ काक, दिग्दर्शक भाऊराव क-हाडे, सुनील सुकथनकर आणि चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले उपस्थित राहणार आहेत.

**पुल-साधू वासवानी**

साधू वासवानी उड्डाण पुलाचा उर्वरित भाग पाडण्याचं काम येत्या आठवड्यात सुरू करण्यात येणार आहे. या कामासाठी रेल्वेनं ब्लॉक देण्यास तत्त्वतः मान्यता दिली आहे. त्याबाबतचं पत्र पुणे महापालिकेला पाठवण्यात आलं आहे. त्यापूर्वी पुलाखाली असलेल्या झोपडपट्टीधारकांचं महापालिका प्रशासनाकडून स्थलांतर केलं जाणार आहे. ५० वर्षापेक्षा अधिक जुना असलेला हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक झाल्यामुळं नवीन रेल्वे उड्डाण पूल बांधण्याचा निर्णय महापालिकेनं घेतला आहे.

**पुरस्कार**

लहुजी समता परिषद आणि गुलमोहर वर्ल्ड फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे युवा प्रेरणा पुरस्कार यंदा रुग्ण हक्क परिषदेचे अध्यक्ष उमेश चव्हाण यांना जाहीर करण्यात आला आहे. पुरस्काराचं हे पहिलंच वर्ष असून, उद्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहामध्ये हा पुरस्कार वितरण कार्यक्रम होणार आहे. या सोहोळ्याला आमदार अमित गोरखे, माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

**सौर शाळा**

शिक्षकांनी आम्हाला घडवले प्राथमिक शाळेतील शिक्षणाचा जीवन जगताना उपयोगी पडते असे मत पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळेचे दुबई येथे स्थित असलेले माजी विद्यार्थी आणि बांधकाम व्यावसायिक मिलिंद देशमुख यांनी व्यक्त केलं. देशमुख यांचे वडील दिवंगत माधवराव देशमुख यांच्या स्मरणार्थ शाळेत उभारण्यात आलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी ते काल बोलत होते. दरमहा 16 किलो वॅट वीज निर्मिती या प्रकल्पातून होणार असल्याची माहिती मुख्याध्यापिका कल्पना वाघ यांनी दिली आहे.

**टेनिस**

पुणे विभागीय शालेय रिंग टेनिस स्पर्धा बारामती इथं पूर्ण झाली. स्पर्धेमध्ये सोलापूर आणि ग्रामीण, पुणे शहर आणि ग्रामीण, पिंपरी चिंचवड, अहिल्यानगर शहर आणि ग्रामीण या संघांनी सहभाग घेतला. 14 , 17 आणि 19 वर्षाखालील गटात या स्पर्धा झाल्या.  भारती विद्यापीठ इंग्रजी माध्यम तर मुलामध्ये पुणे ग्रामीणच्या उरुळी कांचन इथल्या महात्मा गांधी विद्यालयानं प्रथम क्रमांक पटकावला. 19 वर्षाखालील गटात मॉडर्न कॉलेजने प्रथम क्रमांक तर मुलामध्ये श्रमिक कनिष्ठ महाविद्यालय संघ अव्वल आला. 17 वर्षाखालील गटात मुली आणि मुली अशा दोन्ही गटात अहिल्यानगर ग्रामीण संघानं प्रथम क्रमांक पटकावला. हे तीनही संघ गडचिरोली इथं होणाऱ्या शालेय राज्य स्पर्धेत पुणे विभागातून सहभागी होतील.

**बॅडमिंटन**

हवेली तालुका बॅडमिंटन संघटनेच्यावतीनं एचटीबीए करंडक जिल्हा मानांकन बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. 8 ते 16 जानेवारी  या कालावधीत होणाऱ्या या स्पर्धा मुले-मुलींच्या तसच पुरुष आणि महिलांच्या एकेरी आणि दुहेरी गटात होणार आहे. स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूला 50 हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे.

**पुरस्कार**

आध्यात्मिक आणि प्रेरक वक्त्या जया किशोरी यांना काल पुण्यात सूर्यदत्त संस्था समूहाच्यावतीनं राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. अध्यात्म आणि प्रेरणादायी वक्तृत्व क्षेत्रातील उत्कृष्टतेसाठी त्यांना सन्मानचिन्ह, सुवर्णपदक आणि मानपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आलं.

पुणे आणि परिसरात थंडी तूर्तास जाणवत नाही. किमान तापमानात वाढ होऊन उद्या ते 19 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**